हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह

६०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष १० वे : अंक ११
फेब्रुवारी २०२५

स्वागतमूल्य
₹. 30/-



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर अमृतमहोत्सवी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम आणि सर्व संलग्न ब्राह्मण संस्था आयोजित

# धुंदुर्मास सोहळा

**सूर्यपूजन, उपासना आणि भोजन प्रसाद आणि सुप्रसिद्ध अभिनेते विघ्नेश जोशी स्वर-ताल यात्रा**








रविवार, दि. ५ जानेवारी २०२५ रोजी कोल्हापूर चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर मंगल धाम, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सारस्वत विकास मंडळ व अन्य ब्राह्मण संस्था एकत्रित येऊन यावर्षीचा धुंदुर्मास सोहळा अभूतपूर्व उत्साहात पार पडला. निसर्गाचे पालटलेले रूप म्हणजे धुदुर्मास. थंडीच्या या मोसमात सूर्याचे किरण अल्हाद देतात. सूर्यपूजेशी निगडित अनेक व्रतं-वैकल्ये, उत्सव, सण साजरे होतात. आरोग्याला पूरक असे हवामान आणि वातावरण असते. अशा वातावरणात ताजे अन्नपदार्थ, भाज्या, फळे सगळ्यांचा आस्वाद घेणे म्हणजे धुदुर्मास.

स.म.लोहिया हायस्कूल, पेटाळाच्या मैदानावर सर्वप्रथम आत येतानाच सनई-चौघड्यांचा आवाज व हळदी-कुंकू आणि आलेपाक उपस्थित मंडळींना देण्यात आला. कार्यक्रमाचे सूर्यपूजन सौ. व श्री. सौरभ पाटणकर यांनी केले. तर पौरोहित्य श्री. ओंकार खाडिलकर यांनी केले. पूजा सकाळी ७ वाजता पार पडली. कार्यक्रमासाठी ज्या सर्वांनी आर्थिक मदत केली त्या सर्वांचे सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. तुषार दिवेकर व सौ. हरिप्रिया दिवेकर यांनी केले. सूर्यपूजनानंतर सुप्रसिद्ध कलाकार श्री. विघ्नेश जोशी यांचा 'स्वरताल-यात्रा' हा कार्यक्रम झाला. श्री. विघ्नेश जोशी यांनी प्रथम उस्ताद जाकिर हुसैन यांना आदरांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमात त्यांना साथ देण्यासाठी प्रसिद्ध कलाकार, बासरीवादक श्री. सचिन जगताप, व्हायोलिनवर श्री. केदार गुळवणी, तबलावादक श्री. प्रशांत देसाई हे उपस्थित होते. कार्यक्रमाचा आस्वाद जवळपास १५०० उपस्थितांनी घेतला. यानंतर सर्व जणांनी एकत्रित धुदुर्मास प्रसादाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्री. उदय कुलकर्णी यांनी केले, तर आभार श्री. मकरंद करंदीकर यांनी मानले. या कार्यक्रमात सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्रित आल्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक आभार !

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

मासिक नवस्नेह

# नवस्नेह

**वर्ष १० वे : अंक ११ : फेब्रुवारी २०२५**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **ताल ठेक्याचा लय** /५ - अरुण मराठे

३) **ओपनहायमरला समजलं, पण...** /७
- प्रशांत पोळ

४) **अभिमानास्पद !** /११

५) **मुलांचे पान** /१२

६) **ज्ञानसूर्याची सावली** /१४
- सौ. मंजुश्री गोखले

७) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** /१६
- सौ. मंजुश्री गोखले

८) **ब्राह्मण आणि सरकारी अनुदान** /१७
- श्रीकांत शिंत्रे

९) **ऋतू बरवा** /२१ - वैदेही जोशी

१०) **अडाणीपणाची कमाल !** /२४
- आंतरजालावरून साभार

११) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२११२३४८९०




हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ


मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ४ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

नवीन वर्ष सुरू झाल्याचा उत्साह जरा निवळला असेल ना? पुन्हा रुटीनला सुरुवात झाली असेल. सध्या अधून मधून कसले तरी आजार ऐकायला मिळत असले तरी एकंदर हवामान चांगले आहे. त्यामुळे नवस्नेह वाचायलाही तुमच्यात उत्साह असणार आहे. मित्रांनो, या अंकापासून दोन नवीन लेखमाला आपण सुरू करत आहोत. एक आहे, ती म्हणजे ब्राह्मणांसाठी असलेल्या सरकारी योजना, ज्या आपल्याला फारशा माहितही नसतात. त्यांची माहिती मुंबईचे श्री. श्रीकांत शिंत्रे क्रमश: देत आहेत. तर आपण सहा ऋतू आहेत असं मानतो. (उन्हाळा, हिवाळा, पावसाळा हे नव्हेत !) पण त्या ऋतूंबद्दल आपल्याला फारशी माहिती नसते. त्यांची इत्थंभूत माहिती देत आहेत सौ. वैदेही जोशी. दोन अगदी वेगळ्या विषयांवरच्या या लेखमाला तुम्हाला नक्की आवडतील. शिवाय या अंकात तबलानवाज उ. जाकिर हुसेन यांच्यावरचा एक श्रद्धांजलीपर लेखही आहे. तोही तुम्हाला आवडेल. शिवाय नेहमीची सदरे आहेतच.

आपल्या नवस्नेहच्या लेखिका आणि कोल्हापूरच्या सुस्मिता गाडगीळ यांनी बनवलेल्या एका औषधाला नुकतेच भारत सरकारचे पेटंट मिळाले आहे. त्यांचे नवस्नेह परिवारातर्फे अभिनंदन करत आहोतच, पण त्यांच्या त्या पेटंटची माहिती सुद्धा या अंकात देत आहोत. आणखी एक महत्त्वाचा लेख या अंकात घेतलाय तो म्हणजे, भगवद्गीतेचे महत्त्व अधोरेखित करणारा 'ओपनहायमरला जे समजले...' हा लेख.

सनातन धर्माचे सामर्थ्य दर्शवणारा महाकुंभमेळा प्रयागराज येथे भरला आहे. बाकी काही असो, पण कोट्यवधी लोकांची व्यवस्था आम्ही भारतीय पेलू शकतो हा संदेश तरी यातून जगभर पोहोचेल. अर्थात यातून अनेक छुपे संदेशही जाणार आहेत, सर्व जगाला.

**हमेशा वह नही देखे, जो दिखाया जा रहा है।**
**नजर उसपर भी रखे, जो छिपाया जा रहा है ।।**

हे फार महत्त्वाचं आहे.

मित्रांनो, शिवजयंती आणि शिवरात्र दोन्ही या महिन्यात येत आहेत. दोन्हीही आपली श्रद्धास्थाने ! या दोन्हींचं एकत्रीकरण करून या अंकाचं मुखपृष्ठ केलंय आमच्या कल्पक अक्षररचनाकार ज्योती काटवे यांनी. शिवाजी महाराजांची रोहिडेश्वराची शपथ ! प्रेरणा देणारा हा प्रसंग आपल्या सर्वांच्या हृदयावर कोरलेला आहेच. असा सर्वांगसुंदर अंक नेहमीच तुमच्या हातात देण्याचा आम्ही प्रयत्न करतो. तुमच्या अभिप्रायाचीही प्रतिक्षा करतो. जे आम्हांसी ठावे, ते ते तुम्हाला सांगतो.
म्हणूनच नवस्नेह सर्वांना आवडतो.

पुढचा महिना मार्च. आर्थिक घडामोडींचा महत्त्वाचा महिना. आत्तापासूनच तयारीला लागलं पाहिजे, त्यासाठी शुभेच्छा ! थांबते. धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**
**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# ताल ठेक्याचा लय...!

संगीत विश्वावर आपल्या कलेने अनेक दशकं मोहिनी घालणारा युगपुरुष जेव्हा अकाली काळाच्या पडद्याआड होतो तेव्हा फक्त त्या क्षेत्रातले तमाम दिग्गज कलाकार, संगीतप्रेमीच नव्हे तर सामान्य समाज कसा शोकाकुल, भावनाविवश, निशब्द होतो, अक्षरशः हुंदके देऊन अश्रूपात करतो त्याचा हृदयद्रावक अनुभव सर्वांना दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी आला.

**उ. जाकिर हुसेन –** तबला विश्वावर अनेक दशके अधिराज्य करणाऱ्या ह्या कलावंताचे स्मरण आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पुण्यातील पंडित फार्ममध्ये हा भावपूर्ण कार्यक्रम संगीतप्रेमी आणि जाकीरभाईंचे स्नेहांकित श्री. सुरेंद्र मोहिते ह्यांनी पुढाकार घेऊन केला.

सहा वाजता सुरू झालेली ही शोकसभा नऊ वाजेपर्यंत होती. पूर्ण वेळ निःशब्द शांतता, ना कोणाचे भ्रमणध्वनी संच वाजले, ना कोणी एकमेकांशी एक शब्द बोलले. उस्तादांच्या अक्षरशः जिवापेक्षा जास्त असलेल्या कलाप्रेमाच्या, त्यांच्या दिलदारपणाच्या, साधेपणाच्या अनेक आठवणी अनेकांकडून ऐकताना श्रोते अक्षरशः घळघळा रडत होते.

पंडित हरिप्रसादजींनी बोलायला सुरुवात केली तीच शोकाकुल, भावूक, भारावलेल्या जड मनाने. म्हणाले की मला तर असे वाटते आहे की आता ह्या मंचावर जाकीर माझ्याबरोबर साथीला बसणार आहेत कार्यक्रम सुरू होतो आहे, परंतु दुर्दैवाने ते खरं नाहीये.

झाकीरभाई बरोबर देशी परदेशी कार्यक्रम करताना त्यानी सुरुवातीला कसे कष्टात दिवस काढले त्याच्या आठवणी सांगितल्या. विमानखर्च वाचवण्यासाठी २,३ हजार किलोमीटर आलटून पालटून गाडी चालवून कार्यक्रमाच्या ठिकाणापर्यंत कसे पोहोचायचे, दर्शक टाळ्या वाजवून कौतुक करायचे, ज्यांना कल्पना नसायची की वाटेत अगदी स्वस्तातल्या मोटेल मध्ये राहून मॅकडोनाल्डमधले बर्गर खाऊन अनेक मैलांचा प्रवास करून दमून येऊन त्यांनी कार्यक्रम केला आहे.

जाकिरभाईंचे वैयक्तिक वैद्यकीय सल्लागार हृदयरोग तज्ञ डॉक्टर रणजीत जगताप म्हणाले की कलेपासून लांब राहावे लागेल, स्वतःला आणि श्रोत्यांना संगीतानंद देण्यात कमी पडेल, सादरीकरणावर परिणाम होईल म्हणून जाकीरभाई आमच्या सल्याविरुद्ध जाऊन bypass शल्यक्रिया करायला तयार झाले नाहीत. ६ दशकांहून अधिक काळ सतत सराव, कार्यक्रम करता करता तबल्यासाठी वापरण्यात येणारी पावडर त्यांच्या फुफ्फुस संसर्गला कशी कारणीभूत झाली हे सांगितले.

सर्व तबला वादकांनी निदान रियाझ करताना तरी मास्क वापरावा असे आव्हान त्यांनी केले.

मणक्याचे दुर्धर दुखणे असतानाही केवळ रसिकांचे मन राखण्यासाठी That pain is behind me, won't affect while playing Tabla असे म्हणून कार्यक्रम करायचे असे सुरेंद्र भाईंनी सांगितले.

त्यांच्या खिशात त्या त्या देशातील चलनी नोटांची चवड असायची. ते कोणा गरजूंना पैसे देताना कधीच मोजून देत नसत. खिशात हात घालून जेवढे हाती येतील तेवढे पैसे देऊन टाकायचे. मी केवळ निमित्तमात्र आहे, त्यांना मदत देण्यासाठी परमेश्वराने माझी योजना केली आहे म्हणायचे.

तालयोगी सुरेश तळवलकर म्हणाले की प्रयत्नपूर्वक मिळवलेल्या बुद्धी, मन आणि शरीर ह्यांच्या विस्मयकारक एकसुत्री ताळमेळामुळे त्यांच्या बुद्धी आणि मनात एखादी बंदिश आली की ती तशीच्या तशी बोटातून उतरत असे. इतर तबला वादकांना जे दाखवायला ३२ मात्रा लागतील तीच करामत ते ४ मात्रात करून दाखवायचे. त्यांचे घराणे नावालाच पंजाब असेल तरीही इतर सर्व घराण्यातल्या वादकांच्या शैलीत सुद्धा ते सर्वांच्या खूप पुढे होते.

भारतरत्न सचिन तेंडुलकरनी सांगितले की त्यांच्या घरी एकदा बैठक बोलावली होती तेव्हा ते आल्या आल्याचं एवढी आल्हाददायक ऊर्जा घेऊन आले की सर्व वातावरण एकदम प्रसन्न झाले. त्यांच्या आईंना मुद्दाम भेटून चरण स्पर्श करायला अजिबात

विसरले नाहीत.

गणेश कला क्रीडा केंद्रात एकदा रंगलेला कार्यक्रम एक १० वर्षांची मुलगी रंगमंचाच्या जवळील पायऱ्यांवर बाहेरून तासभर हात जोडून ऐकत उभी होती. तिला सुरक्षा रक्षकांनी विचारले तर म्हणाली की मी देव बघितला नव्हता तो आज मला दिसला त्याचे दर्शन घेते आहे.

कार्यक्रम संपल्यावर नेहेमीप्रमाणे दमून पण लोकांच्या गराड्यात असताना त्यांनी नेमके त्या मुलीला प्रेमाने जवळ बोलवून फोटो नाही का घ्यायचाय तुला असे विचारून तिला खुश केले. म्हणजे त्यांना जाण होती की ती मुलगी तिथे एवढा वेळ तल्लीन होऊन हात जोडून ऐकते आहे.

एका कार्यक्रमाची ठरलेली मोठी रक्कम एकदा आयोजक द्यायचे विसरले. याची इतरांनी आठवण अनेकदा करून दिल्यावर म्हणाले की त्यांना काय समस्या आहेत ते आपल्याला काय माहित, सोडून द्या..

त्यांचे गुरुबंधू योगेशजी म्हणाले की अल्लारखा आणि त्यांच्यामधील दुवा म्हणजे जाकीरभाई होते. अल्लारखा म्हणायचे की इसको तो मलिक ने खास भेजां है. योगेशजी शिकायला जात तेव्हा त्यांना जाकीरभाईंना रियाझ करताना पाहायला मिळायचे. त्यांनी सांगितलेली एक गोष्ट त्यांच्या हृदयावर कायम कोरली गेली आहे. ती म्हणजे Tabla is impression and Baya is expression असे समजून त्यांच्या समन्वयाने कलेचा आनंद घेऊन परमेश्वरापर्यंत आणि रसिकांच्या हृदयापर्यंत पोहोचायचे असते.

नवीन कलाकारांना आदराने वागवणे हे त्यांच्या साधेपणाचे आणखी एक फार दुर्मिळ वैशिष्ठ. सत्यजीत तळवलकर म्हणाले की त्यांना ते १९९५ साली भेटले तेव्हा त्यांच्यासमोर वादनाने प्रगट होण्याची खूपच भीती वाटत होती, परंतु उस्तदांनी कसे प्रेमाने त्यांना प्रोत्साहन दिले.

पंडित राकेश चौरसियांना त्यांची खूपच आदरयुक्त भीती वाटायची. पहिला कार्यक्रम करताना राकेशजीनी पूर्ण कार्यक्रम डोळे मिटून घेतले होते. तेव्हा जाकिरभाई त्यांना म्हणाले की आपल्या दोघांमध्ये जर संवाद नसेल तर आपल्या वादनात मेळ येणे कठीण आहे. असे असेल तर तू खालीच का बसला नाहीस? आपण वय आणि एकमेकांचा दर्जा मनात न आणता खुलेपणाने कला सादर केली तरच श्रोत्यांना आनंद देऊ शकू.

हृदय हेलावून टाकणारे असे अनेक किस्से श्रोते अक्षरशः निशब्द होऊन, देहभान भूक तहान विसरून तीन तास पुतळ्यासारखे बसून ऐकत होते.

सुरेंद्रभाईंना आणि इतर अनेकांना मंचावर बोलताना रडू कोसळले. श्रोतेसुद्धा भावनाविवश होऊन अश्रुपात करत होते.

सुरेंद्रजी म्हणाले की सर्वांसाठी (२०००+) लोकांसाठी केवळ झाकीर भाईंना खूप आवडीचा म्हणून शिऱ्याची व्यवस्था केली आहे. नाहीतर रात्री स्वप्नात येऊन विचारतील की माझ्यासाठी जमलेल्या एवढ्या लोकांना उपाशी परत पाठवलेस तू.

सर्व श्रोते, प्रेक्षक खूपच भारावलेल्या अवस्थेत बाहेर पडले. प्रवेश द्वाराशीच ठेवलेली उस्तादांच्या नेहेमीच्या सुहास्य प्रतिमेला वाहण्यासाठी ठेवलेली फुले वाहत होते. नतमस्तक होऊन परत भारावून जात होते. सुरेंद्र मोहितेंना त्यावेळीही भावना अनावर झाल्या होत्या.

शरीर शास्त्राला बुचकळ्यात टाकणारा एक अनुभव सुरेंद्र मोहितेंनी सांगितला त्याने तर उपस्थितांची मने आणखीन भारावून गेली. कोणा संताबद्दल एक कथा सांगितली जाते की मृत्यूनंतर त्यांच्या अवशेषातून विठ्ठल नाम ऐकू येत होते. झाकिर भाईंच्या अंत्यसंस्कारासाठी ३ दिवसांनी जेव्हा त्यांचे पार्थिव शवागरातून आणले गेले तेव्हा अनेक वर्षे तबला वादनासाठी अक्षरशः वाहून घेतलेले त्यांचे हात पूर्णपणे लवचिक अवस्थेत होते, अजिबात ताठ झाले नव्हते. कलारुपी ईश्वराला वाहिलेले शरीर सुद्धा त्यांच्याबरोबर संगीतमय होऊन गेले होते ह्याचाच हा पुरावा नाही का !

असा दिग्गज हजारो वर्षात एकदा होतो. त्यांच्या श्रद्धांजलीसाठीची शोकसभा म्हणजे कलाकार आणि कलेची महती, परमेश्वराच्या अस्तित्वाची प्रत्यक्ष अनुभूती देणारी दुःखद परंतु संस्मरणीय झाली !

**– अरुण मराठे,**

एक सर्वसामान्य कलाप्रेमी, पुणे

# ओपनहायमरला हे समजलं, पण...

सन २०२३ च्या २१ जुलैला, क्रिस्टोफर नोलनचा 'ओपनहायमर' हा सिनेमा, भारतीय चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. जे रॉबर्ट ओपनहायमरला जग, 'अणुबॉम्बचा जनक' म्हणून ओळखतं. त्यामुळे ह्या चित्रपटाबद्दल लोकांची उत्सुकता होती. भारतात मात्र हा चित्रपट गाजला तो एका वेगळ्याच कारणाने. रॉबर्ट ओपनहायमरची भूमिका करणारा किलियन मर्फी, फ्लॉरेंस बग बरोबरच्या एका अंतरंग दृश्यात, भगवद्गीतेच्या काही ओळी म्हणून दाखवतो, असं दृश्य चित्रपटात दाखवलं आहे. या एका दृश्यामुळे हा चित्रपट विवादित ठरला, आणि त्यामुळे अजूनच गाजला. या दृश्याला जरी बाजूला ठेवलं, तरी या चित्रपटामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात एक गोष्ट मात्र घट्ट रुतून बसली, की 'रॉबर्ट ओपनहायमर हा भारतीय तत्त्वज्ञानाचा चाहता आणि भगवद्गीतेचा अभ्यासक होता.'

रॉबर्ट ओपनहायमर हा मुळात अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ. धर्माने ज्यू. त्याचा जन्म न्यूयॉर्कचा. मात्र त्याने भौतिकशास्त्रात डॉक्टरेट मिळवली, ती जर्मनीच्या गोटिंगन विद्यापीठातून. ते वर्ष होतं १९२७. याच काळात त्याचा भारतीय तत्त्वज्ञानाशी परिचय झाला. जर्मनीतल्या विद्यापीठांमध्ये त्या काळातही संस्कृतचा अभ्यास करणारे आणि शिकवणारे भरपूर होते. त्यामुळे ओपनहायमरला भारतीय तत्त्वज्ञानाची आणि प्राचीन ग्रंथांची गोडी लागली.

पुढे ओपनहायमर जेव्हा अमेरिकेच्या बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात शिकवायला लागला, तेव्हा त्याने आर्थर रायडर या संस्कृतच्या प्राध्यापकाची मदत घेऊन अनेक प्राचीन भारतीय ग्रंथांचा अभ्यास केला. मात्र त्याचा ओढा होता तो भगवद्गीतेकडे. त्याचं मत होतं की 'भगवद्गीता हे जगातील कोणत्याही भाषेतील सर्वात सुरेल असं तत्त्वज्ञानाचं गाणं आहे'. (Bhagwad Gita is the most beautiful philosophical song). त्याच्या अभ्यासाच्या टेबलावर नेहमी भगवद्गीतेची प्रत ठेवलेली असायची. आपल्या आवडत्या व्यक्तींना तो भगवद्गीतेचा इंग्रजी अनुवाद भेट द्यायचा. पुढे त्याने न्यू मेक्सिकोच्या लॉस अलामोस जवळच्या अलामोगार्दो येथे पहिल्या परमाणु बॉम्बचे परीक्षण केले. म्हणून लॉस अलामोस येथे, ब्रेडबरी सायन्स म्युझियममध्ये, एक 'युएस नॅशनल सिक्युरिटी रिसर्च सेंटर' आहे. त्या सेंटरमध्ये, ओपनहायमरच्या दोन वैयक्तिक वस्तू ठेवलेल्या आहेत. त्यातली एक आहे ती खुर्ची, ज्यावर बसून अलामोसच्या त्याच्या कार्यालयात, ओपनहायमरने, परमाणु विखंडनाच्या बारकाव्यांवर काम केलं. दुसरी वस्तू आहे, भगवद्गीतेची प्रत, जिच्या पहिल्या पानावर, उजवीकडे वरती, ओपनहायमरने त्याची अद्याक्षरं लिहिलेली आहेत..!

दुसऱ्या विश्वयुद्धाच्या काळात अमेरिकेला अणुबॉम्ब बनवण्याची घाई झालेली होती. त्यासाठी लॉस अलामोस येथे १९४३ च्या एप्रिल महिन्यात, एक प्रयोगशाळा सुरू झाली, ज्याचा प्रमुख म्हणून ओपनहायमरची नियुक्ती झालेली होती. या प्रयोगशाळेच्या जवळच, अलामोगार्दो हे परीक्षणाचं ठिकाण होतं. विश्वयुद्ध अगदी शेवटच्या टप्प्यात आलेलं असताना, रॉबर्ट ओपनहायमरने, १६ जुलै १९४५ ला, अगदी पहाटे, स्थानिक वेळेनुसार ५ वाजून २९ मिनिटांनी, अलामोगार्दो येथे अणुबॉम्बचे एक लहानसे परीक्षण केले. या परीक्षणाला त्याने 'ट्रिनिटी टेस्ट' असे नाव दिले.

हे परीक्षण म्हणजे एक जबरदस्त अनुभव होता. लॉस अलामोस आणि अलामोगार्दो हा पूर्ण वाळवंटी प्रदेश आहे. या प्रदेशात परीक्षणाच्या वेळी अतिशय प्रखर असा झगझगीत प्रकाश निर्माण झाला अन अक्षरशः प्रचंड उष्णता निर्माण झाली.

हा प्रकाश बघताक्षणीच, रॉबर्ट ओपन–हायमरला भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायातील १२

वा श्लोक आठवला. अर्थात, ओपनहायमरला संपूर्ण भगवद्गीता पाठ होती आणि तिचा अर्थही माहीत होता, असं दिसतं.

ओपनहायमरला आठवलेला तो श्लोक होता –

**दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।**

**यदि भा: सदृशी सा स्याध्दासस्तस्य महात्मनः ।।**

बालमोहन लिमये यांनी या श्लोकाचा अर्थ देताना, अर्जुनवाडकरांच्या 'गीतार्थ दर्शना'च्या ओळी दिलेल्या आहेत. त्या अशा आहेत –

हजारो सूर्यांची झळाळी होईल जर प्रकट आकाशात एकाच वेळी, तर ती असेल कदाचित तशी, जशी झळाळी त्या सर्वात्मकाची...

कौरव–पांडवांच्या युद्धात, अर्जुनाला उपदेश करताना भगवान श्रीकृष्ण जसे आपल्या प्रखर आणि तेजस्वी रूपात उभे राहतात, अगदी तसाच अनुभव ओपनहायमरला अणुबॉम्बच्या परीक्षणाच्या वेळी आलेला आहे.

लक्षात घ्या, ओपनहायमर हा भावनेच्या आणि कल्पनेच्या भरात वाहत जाऊन काहीतरी सांगणारा सामान्य माणूस नव्हता. तर तो जगातील सर्वश्रेष्ठ असा भौतिक शास्त्रज्ञ होता. अणुशास्त्रज्ञ होता.

या जगातील पहिल्या–वहिल्या लहानश्या अणुबॉम्बचा विस्फोट झाल्यावर, जमिनीवर आणि आसमंतात जी काही विचित्र परिस्थिती निर्माण झाली, त्या वाळवंटातली वाळू वितळून त्याची फिक्कट हिरवी काच निर्माण झाली, ती परिस्थिती अतिशय भयानक होती. हे सर्व बघून ओपनहायमर ला गीतेच्या ११ व्या अध्यायातीलच ३२ वा श्लोक आठवला –

**कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो**

**लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः ।**

**ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः**

**प्रत्यनीकेषु योधाः ।।३२।।**

कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर यांच्या 'गीतार्थ दर्शन' या ग्रंथात, त्यांनी या ओळींचा समश्लोकी अर्थ दिलेला आहे –

कर्दनकाळ आहे मी, लोकांचा संहार करणारा, फोफावून आलेला, आलो आहे इथे लोकांचा संहार करण्यासाठी...

तू नसलास तरी नाहींसे होणार आहेत सगळे योध्दे, जे उभे आहेत शत्रूच्या सैन्यात...

मुळात, 'एका जगप्रसिद्ध भौतिक शास्त्रज्ञावर भारतातल्या प्राचीन ग्रंथांनी आपला प्रभाव टाकला', इतकंच याचं महत्त्व नाही. आपल्या प्राचीन ज्ञान परंपरेत अनेक गोष्टींची स्पष्टता होती, जी ओपनहायमरसारख्या शास्त्रज्ञांना भावली. फक्त गीताच नाही, तर भर्तृहरीच्या 'शतकत्रय' सारख्या ग्रंथांचाही त्याने अभ्यास केला होता. भर्तृहरीने शंभर – शंभर श्लोकांचे, 'नीति शतक', 'शृंगार शतक' आणि 'वैराग्य शतक' लिहिले. हे ज्या ग्रंथात आहेत, तो म्हणजे 'शतकत्रय'. विशेषतः जीवनाच्या संबंधित असलेल्या तत्त्वज्ञानाचा सर्वांगीण विचार करणारा हा ग्रंथ, ओपनहायमर मूळ संस्कृत मधून वाचायचा, हे विशेष !

अनेक भौतिक शास्त्रज्ञांना प्राचीन संस्कृत ग्रंथांचे आकर्षण होते. कारण भौतिकशास्त्राचे अनेक मूलभूत सिद्धांत या प्राचीन ग्रंथात आधीपासून दिलेले आहेत. खुद्द ओपनहायमरचेच उदाहरण देता येईल. पहिल्या अणुबॉम्ब विस्फोटाच्या सात वर्षांनंतर, ओपनहायमर हा रोचेस्टर विद्यापीठात, 'परमाणु विखंडन' या विषयावर भाषण द्यायला गेला. भाषणानंतर जो प्रश्नोत्तरांचा वेळ होता, त्यात एका विद्यार्थ्याने ओपनहायमरला प्रश्न विचारला –

आलामोगार्दो येथे, मॅनहटन प्रकल्पामध्ये, ज्या अणुबॉम्बचा विस्फोट केला गेला, तो पहिलाच बॉम्ब होता का?

ओपनहायमरने लगेच, अगदी सहजतेने उत्तर दिले, होय. आधुनिक काळात तरी नक्कीच.

यावरून ओपनहायमरला नेमकं काय सुचवायचं होतं..?

आता लवचिकता (इलेस्टिसिटी) या पदार्थाच्या गुणधर्माचं उदाहरण घेऊ. आधुनिक

विज्ञानाच्या मताप्रमाणे 'इलेस्टिसिटी' हा पदार्थाचा गुणधर्म, सर्वात आधी शोधला तो रॉबर्ट हूक या इंग्रज भौतिक शास्त्रज्ञाने, सन १६६० मध्ये. सन १६६७ मध्ये त्याने तो सिद्धांताच्या रूपात मांडला, जो पुढे जाऊन 'हुकचा नियम' (Hook's Law) म्हणून प्रसिद्ध झाला. हा नियम सांगतो, की 'कुठल्याही पदार्थाच्या लांबी किंवा रुंदीत परिवर्तन, हे त्या पदार्थावर लावल्या गेलेल्या बलाच्या समानुपाती असते'.

आता जरा याच्याही मागे जाऊ. किती मागे..? तर साधारण सहाशे - सातशे वर्ष मागे. बंगालच्या हुगळी जिल्ह्यातील भूरिश्रेष्ठ गावाच्या 'श्रीधराचार्य' या विद्वान गृहस्थांनी, दहाव्या शतकात 'न्यायकंदली' हा ग्रंथ लिहिला. आजच्या भाषेत हा ग्रंथ, 'मटेरियल सायन्स' वर लिहिलेला ग्रंथ आहे. या ग्रंथातल्या एका श्लोकामध्ये श्रीधराचार्य काय म्हणतात -

**ये घना निबिडा: अवयवसन्निवेशा: तै: विशिष्टेषु स्पर्शवत्सु द्रव्येषु वर्तमान: स्थितीस्थापक: स्वाश्रयमन्यथा कथमवनामितं यथावत् स्थापयति पूर्ववदृजु: करोती ।**

संस्कृत समजणाऱ्या कोण्याही व्यक्तीला, या श्लोकाचा अर्थ सहजपणे समजून येईल. यात आलेला 'स्थितीस्थापक' हा शब्द म्हणजे 'इलेस्टिसिटी'. अर्थात हा श्लोक सांगतो -

'इलॅस्टिसिटी हा, घनतेने असलेला पदार्थाचा आकार जर एखाद्या बाह्य बलाने बदलला, तर त्याला परत आपल्या मूळ स्थितीत आणणारा गुणधर्म आहे'.

इतकं स्पष्ट लिहूनही, जर आजही आपण विद्यार्थ्यांना शिकवणार की इलेस्टिसिटी चा शोध रॉबर्ट हुक ने लावला, तर आपल्यासारखे कपाळ करंटे आपणच..! 'हुक्सचा नियम' (Hook's Law) कशाला? 'श्रीधराचार्यांचा नियम' (Sridharacharya's Law) कां नाही..?

गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचेही असेच.

आपण सर्व लहानपणापासून शिकत आलोय की गुरुत्वाकर्षणाचा शोध आयझॅक न्यूटनने लावला. सन १६८७ मध्ये लिहिलेल्या 'प्रिन्सिपिया' या ग्रंथात त्याने सर्वप्रथम गुरुत्वाकर्षणाची संकल्पना मांडली. आपल्या शिक्षकांनी, 'न्यूटनने झाडावरून सफरचंद पडताना पाहिले आणि त्याला गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला' असं घोकून घेतलं होतं.

मात्र खरी परिस्थिती फार वेगळी आहे. उपनिषदांचा काळ हा साधारण दोन हजार ते साडेचार हजार वर्ष जुना समजला जातो. या उपनिषदांपैकी १० उपनिषदांवर शंकराचार्यांनी भाष्यं लिहिली आहेत. त्यातील एक आहे - 'प्रश्नोपनिषद'. अर्थात मूळ प्रश्नोपनिषद हे किमान दोन - अडीच हजार वर्षे जुने. त्यावर शंकराचार्यांनी लिहिलेले भाष्यही किमान तेराशे वर्ष जुने. या भाष्यात तिसऱ्या अध्यायात आठवा श्लोक आहे --

**तथा पृथ्वीव्यामभिमानिनी या देवता प्रसिद्धा सैषा पुरुषस्य अपानवृत्तिमवष्टभ्याकृष्य वशीकृत्याध एव अपकर्षेण अनुग्रहं कुर्वती वर्तत इत्यर्थ: । अन्यथा हि शरीरं गुरुत्वात् पतेत् सावकाशे वोद्गच्छेत ।।**

अर्थात, पृथ्वी ही देवता, मानवातील 'अपान' ला आकर्षित करते. त्याला नियंत्रित ठेवते. त्याला स्थिर ठेवते. पृथ्वीचा हा गुणधर्म नसता, तर मानव शरीर हे त्याच्या वजनामुळे जमिनीवर पडलं असतं किंवा मुक्तपणे आकाशात विहरत असतं.

फक्त शंकराचार्यच नाही, तर आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी गुरुत्वाकर्षणाच्या गुणधर्माबद्दल अनेक ठिकाणी लिहून ठेवलं आहे.

ब्रह्मगुप्त यांनी सन ६२८ मध्ये 'पृथ्वीत गुरुत्वाकर्षण बल आहे' असं स्पष्टपणे सांगितलं होतं. त्यांनीच सर्वप्रथम 'गुरुत्वाकर्षणम्' हा शब्द वापरला. त्यांनी लिहिलं आहे, 'उल्कापिंड पृथ्वीवर पडतात, कारण पृथ्वीचा स्वभाव आहे की ती पिंडांना आकर्षित करते'. पुढे ते त्यांच्या 'ब्राह्मस्फुट सिद्धांत' या ग्रंथात लिहितात, 'सर्व भारी वस्तू पृथ्वीच्या केंद्राकडे आकर्षित होतात. वस्तूंना आकर्षित करणे

आणि जवळ ठेवणे ही पृथ्वीची प्रवृत्ती आहे'.

नंतर साधारण चारशे वर्षांनी भास्कराचार्यांनी 'सिद्धांत शिरोमणी' या ग्रंथातील गोलाध्याय च्या भुवनकोष मधील सहाव्या श्लोकात लिहिले–

**आकृष्टशक्तिश्च मही तया यत् खस्थं**
**गुरु स्वाभिमुखं स्वशक्तया ।**
**आकृष्यते तत् पततीव भाति,**
**समे समंतात् क्व पतत्वियं खे ।।**

अर्थात, पृथ्वीमध्ये आकर्षण शक्ती आहे. या शक्तीमुळे ती भारी वस्तूंना आपल्याकडे खेचते व ह्यामुळेच वस्तू जमिनीवर पडतात.

अर्थात हजारो वर्षांपासून, अत्यंत स्पष्ट शब्दात, आपले पूर्वज पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्ती बाबत सातत्याने बोलत होते...

पण आपण मात्र इंग्रजाळलेल्या मानसिकतेचे करंटे, आपण आजही आपल्या विद्यार्थ्यांना, 'गुरुत्वाकर्षणाचा शोध न्यूटनने लावला', हेच शिकवत असतो !

मी शाळेत शिकलोय की सन १५४३ मध्ये कोपर्निकस या पोलिश शास्त्रज्ञाने, सर्वप्रथम हा शोध लावला की अंतरिक्षाचा केंद्रबिंदू सूर्य आहे आणि पृथ्वी त्याच्याभोवती फिरते. आधुनिक विज्ञानाच्या मते हा एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी शोध होता, कारण यापूर्वी पर्यंत पाश्चात्य जग हे बायबल मध्ये लिहिल्यानुसार, पृथ्वीला सपाट (चपटी) मानत होतं आणि सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असं समजत होतं.

मात्र याच्या कितीतरी आधी, अक्षरशः हजारो वर्ष आधी, आपले पूर्वज अत्यंत स्पष्टपणे सांगत होते की पृथ्वी गोल आहे आणि ती सूर्याभोवती फिरते.

साधारण अडीच हजार वर्षांपूर्वीच्या विष्णुपुराणाच्या दुसऱ्या भागात, आठव्या अध्यायातला पंधरावा श्लोक बघा –

**नैवास्तमनमर्कस्थ नोदयः सर्वदा सतः ।**
**उदयास्तमनाख्यं हि दर्शनादर्शनं रवेः ।।**

'सत्य हे आहे की सूर्याचा उदय आणि अस्त होत नसतो. तो तिथेच, एका जागीच, असतो'.

अश्याच प्राचीन, यजुर्वेदाच्या आरण्यकामध्ये, आठव्या अनुवाक मधला तिसरा वर्ग आहे –

**दाधर्व पृथ्वी भितो मयुखैः**

अर्थात, 'सूर्य हा पृथ्वीला सर्व बाजूंनी, त्याच्या किरणांच्या साह्याने पकडून ठेवतो'.

अशी अनेक उदाहरणं आहेत. चुंबकाच्या बाबतीतही हेच.

चुंबकाचा शोध हा इंग्रज शास्त्रज्ञ विल्यम गिल्बर्ट याने सन १६०० मध्ये लावला, असं मानलं जातं. आपल्या प्राचीन ग्रंथात अनेक ठिकाणी चुंबकाचा उल्लेख येतो. विल्यम गिल्बर्ट च्या पाचशे वर्षांआधी, 'रसार्णव' या रसायन शास्त्रावरील ग्रंथात, चुंबकाचा अगदी स्पष्ट आणि परिपूर्ण उल्लेख आहे. यातील ४० व्या अध्यायातील २१ वा श्लोक आहे–

**भ्रामकं चुंबकं चैव कर्षकं द्रावकं तथा ।**
**एवं चतुर्विधं कांतं रोमकांतंचं पंचमम् ।।**
**एकद्वित्रीचतुः पंच सर्वतोमुखमेव तत् ।**
**पीतं कृष्णं तथा रक्तं त्रिवर्ण स्यात पृथक् पृथक् ।।**

अर्थात, या श्लोकात फक्त चुंबकाचं वर्णन किंवा गुणधर्म नाहीत, तर पाच प्रकारचे चुंबक सांगितले आहेत – १. ब्रह्मकम् २. चुंबकम् ३. कर्षकम् ४. द्रावकम् ५. रोमकंटकम्.

यातील प्रत्येक चुंबक हे एकमुखी, द्विमुखी, त्रिमुखी ... इत्यादी असते. आणि यातील प्रत्येक चुंबकाचा रंग हा पिवळा, काळा किंवा लाल असू शकतो.

अशी किती उदाहरणे द्यायची..? पाश्चात्य विद्वानांनी शोधलेल्या अनेक गोष्टी, अनेक सिद्धांत, आपल्या पूर्वजांना फार आधीपासून माहीत होत्या आणि समाजात सुद्धा या ज्ञानाचा अगदी सहजतेने वापर होत होता. आणि म्हणूनही असेल कदाचित, ओपनहायमर सारख्या शास्त्रज्ञांना प्राचीन भारतीय ज्ञानाची भुरळ पडली होती..!

**– प्रशांत पोळ, जबलपूर**
मोबा. ९४२५१५५५५१

# अभिमानास्पद !

बाळाचं आईच्या उदरात अंकुरणं हे कधी आणि कसं  होईल हे जसं सांगता येत नाही, तसंच ही गोळी, मी का तयार केली काही आठवत नाही. पण ती गुणवंत निपजली, यात मात्र शंका नाही. बहुतेक वेळा मी नवीन प्रयोग केला की लगेचच त्यातील  घटक, त्या घटकांचे प्रमाण लिहून ठेवत असे. मात्र त्या औषधाचा रुग्णावर दिसणारा परिणाम मात्र, त्या त्या रुग्णाच्या केस पेपर वरच  लिहीत गेले.

आज पासून सुमारे पन्नास वर्षांपूर्वी, इ. स. १९७३ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर, डॉ. मोहन रामचंद्र गाडगीळ  B.A.M.S. यांनी, रंकाळा स्टॅन्ड समोर, नाभिक समाजाच्या, सेना विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीमध्ये, दवाखाना सुरू केला. त्यानंतर आमच्या लग्नानंतर म्हणजे  फेब्रुवारी १९७४ मध्ये, मी सुद्धा दवाखान्यात काम करू लागले. कोल्हापूर मध्ये आमचे घर नव्हतेच. त्यामुळे राहणे आणि दवाखाना दोन्हीसाठी मिळून आम्ही भाड्याची जागा घेतली.

यथावकाश एका पाठोपाठ एक दोन मुलांचा जन्म झाला. मुलं पूर्णवेळ प्राथमिक शाळेत जाऊ लागल्यानंतर मला थोडासा निवांतपणा मिळत असे. हळूहळू  दवाखान्यात काम नसेल तेव्हा, माझे काही बाही प्रयोग चालत. मात्र एक सांगू इच्छिते की

पान २० वर पहा...


## डॉ. सुस्मिता गाडगीळ यांच्या लेपगोळीला मिळाले पेटंट

### तीस वर्षांपूर्वी केले संशोधन : करट, गळूवर गुणकारी गोळी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : तीस वर्षांपूर्वी संशोधन करून डॉ. सुस्मिता- मोहन गाडगीळ यांनी तयार केलेल्या शोथघ्न लेपगोळीला नुकतेच भारत सरकारचे पेटंट मिळाले आहे. करट, गळूपासून मुक्ती मिळविण्यासाठी ही गोळी उपयुक्त ठरणारी आहे. अंबाई टँक परिसरात राहणाऱ्या डॉ. गाडगीळ या वयाच्या पंचाहत्तरीमध्ये देखील आरोग्य सेवा देत आहेत.

या संशोधनाबाबत डॉ. गाडगीळ यांनी सांगितले की, 'करट आणि गळू यामुळे शरीरावर जिथे-जिथे सूज आणि जंतूसंसर्ग असेल, तिथे ही लेपगोळी अत्यंत प्रभावी ठरते. ही गोळी सहाणेवर पाण्यात उगाळून त्याचा लेप सुजेवर लावावा लागतो. या लेपामुळे सूज आणि वेदना दोन्हीही कमी होतात. बऱ्याचवेळा पोटातसुद्धा गोळ्या घेण्याची गरज पडत नाही. संधिवातामुळे गुडघे, घोटे इत्यादी ठिकाणी आलेली सूज याच्या लेपाने कमी होते. दाढ किडली असेल, तर गालावर बाहेरून लेप लावल्याने आतील हिरडीची सूज उतरते. पायाच्या बोटांना झालेले कुरूप याच्या लेपाने पूर्ण बरे होते. केसतोडा तथा बॉईल केवळ या गोळीच्या लेपाने पूर्णपणे बरे होते. शस्त्रक्रिया, ड्रेसिंग करण्याची आणि पोटात औषध घेण्याची गरज पडत नाही. खूप मोठे झालेले करटसुद्धा याच्या लेपाने पूर्ण बरे होते. अशी ही बहुगुणी गोळी आहे.'



शोथघ्न लेपगोळी.




'या शोथघ्न लेपगोळीचे संशोधन तीस वर्षांपूर्वी केले. मात्र, पेटंट घेण्यासाठी दोन वर्षांपूर्वी अर्ज केला. माझ्या संशोधनाची दखल घेऊन सरकारने पेटंट मंजूर केल्याचा आनंद वाटत आहे. कुटुंबीयांच्या पाठबळावर हे यश मला मिळविता आले.

-डॉ. सुस्मिता गाडगीळ


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक अडतिसावा)

१४

निवृत्ती-ज्ञानेश्वर माधुकरी घेऊन आले, तरी सोपान रुसलेलाच होता. निवृत्तीदादानं आल्याबरोबर ओळखलं की, या सोपानाचं काहीतरी बिनसलं आहे. त्यांनी मुक्ताकडं पाहिलं. ती पर्णावली लावत बसली होती, पण तिच्या चेहऱ्यावर एक खट्याळ हसू होतं. निवृत्तीदादानं ओळखलं, या चिमुरडीनं या सोपानाची काहीतरी खोडी काढली असणार. निवृत्ती सोपानाजवळ गेला. म्हणाला, 'काय रे सोपान, अरे इतका समंजस तू आणि असा रुसका चेहरा करून काय बसला आहेस? माझं शिकवण्यात काही चुकलं का?' तो प्रश्न ऐकून सोपान अस्वस्थ झाला. 'छेः छेः, दादा कसा चुकेल? हा काहीतरीच विचारतोय झालं!' त्याच्या मनानं कौल दिला. तो दादाला काहीतरी उत्तर देणार, तोच मुक्ता म्हणाली, 'हेच, मी हेच म्हटलं त्याला! मी त्याला म्हटलं, दादासारखा महागुरू तुला गुरू म्हणून लाभलाय. तो तुला खूप-खूप चांगलं शिकवेल; पण तुझ्या मस्तकात त्यातलं काही शिरतंय का? की घसरून जातंय पाठीमागून? आता यात माझं काय चुकलं? दादा शिकवतोय ते त्याला समजलंय की नाही? उमजतंय की नाही, हे विचारायला नको का?' मुक्तानं चेहरा भोळा केला. डोळ्यांत निरागस भाव आणले. स्वरात प्रांजलपणा आणला. ते बघून सोपान आणखीच चिडला. तिचा चेहरा बघून निवृत्तीला हसू फुटलं; पण त्यानं ते चेहऱ्यावर उमटू दिलं नाही. ओठांतून ओघळू दिलं नाही. नाहीतर सोपान आणखीच रुसला असता; पण ज्ञानेशानं मात्र सोपानाची बाजू घेतली. म्हणाला, 'मुक्ते, ते अध्ययन- अध्यापन बघायला जर तू असतीस ना, तर तू असं बोललीच नसतीस. अगं दादा जे शिकवत होते ना, ते सोपान अगदी एकचित्त होऊन ग्रहण करत होता. त्या तेवढ्या प्रहर-दीड प्रहरात तो जराही विचलित झाला नाही!' ज्ञानेशाचं बोलणं ऐकून सोपानाचा चेहरा खुलला. तोच निवृत्तीदादा पुढे म्हणाला, 'मुक्ते, मी महागुरू आहे की नाही, ते मला माहीत नाही; पण हा सोपान मात्र आदर्श शिष्योत्तम आहे. अगं अगदी एकचित्त होऊन ज्या एकाग्रतेनं तो माझे शब्द ग्रहण करत होता, ते बघून मीही स्तिमित झालो. त्याची जिद्द, त्याची चिकाटी, त्याचा संयम अगदी वाखाणण्यासारखा आहे बघ!' निवृत्तीदादाचं बोलणं ऐकून आता मात्र सोपानाला जोर चढला, ऐकलंस मुक्ते ? मिळालं तुझ्या प्रश्नाचं उत्तर? असं विचारून त्यानं मुक्तीला वेडावून दाखवलं. मग मात्र मुक्ता गंभीर झाली. हळूच म्हणाली, 'दादा, निवृत्तीदादा एक विचारू? रागावणार नाहीस ना?' तिचा हळुवार स्वर, त्यातले मार्दव, चाचरत बोलणं, बोलताना अनुमती घेणं, हे सगळं निवृत्ती-ज्ञानेशाला नवीन होतंच, यात सोपानालाही नवल वाटलं. 'मुक्ते, अगं विचार की! अनुमती कसली मागतेस? विचार!' निवृत्तीदादाच्या स्वरातलं अभय सगळ्यांनाच जाणवलं. दादा, तू मलापण शिकवशील? मलापण तुमच्यासारखं सगळं शिकावंसं वाटतं! आईनं मला भगवद्गीता शिकवली आहे, त्या वेळी जरी ती मला पूर्ण मुखोद्गत नसली, तरी आता आहे: पण मलाही सगळं शिकायचंय. तू मलापण शिकवशील? मुक्तीनं पुन्हा विचारलं. सोपानाचं डोळे विस्फारले. ज्ञानेशाच्या डोळ्यांत कौतुक उमटलं; पण निवृत्तीदादा शांत होता. तो काही बोलणार, तोच सोपान म्हणाला, 'मुक्ते, तू शिकणार? कठीण आहे गं बाई! अगं काही शिकण्यासाठी आधी तुला एका जागी स्थिर बसायला शिकायला हवं! दादा, या मुक्तीला शिकवायचं, म्हणजे वाऱ्याच्या पायात खोडा आणि विद्युल्लतेच्या नाकात वेसण घालण्यासारखं

आहे!' आता चिडवण्याची वेळ सोपानाची होती आणि रुसण्याची मुक्ताची. तिनं नेहमीप्रमाणं नाक उडवून सोपानाला चिडवून दाखवलं. ते बघून ज्ञानेश्वर-निवृत्ती खळखळून हसले. मग मात्र मुक्ताला फारच राग आला. निवृत्तीनं आपलं हास्य आवरतं घेतलं. निवृत्ती ज्ञानेश्वर- सोपानाला दटावत म्हणाला, 'अरे काय माझ्या छकुलीला असं चिडवताय ? चला, आता सगळ्यानांच भूक लागली आहे आणि भूक लागलेली असली, की राग जास्तच येतो. होय ना मुक्ता? चला आता जेवण करू या.' निवृत्तीच्या दटावण्याने ज्ञानेश्वर-सोपान बाहेर गेले. डोणीवर हात-पाय धुऊन आले. निवृत्तीकडे एक रुसवा कटाक्ष टाकून मुक्ता उठली आणि माधुकरीची झोळी काढून त्यातून अन्न काढू लागली. ज्ञानेशानं आत येऊन पर्णावली मांडल्या. सोपानानं पाण्याचे गडवे भरून घेतले. सगळे जेवायला बसले.

जेवणं झाली, तसा ज्ञानेशाचा चेहरा गंभीर झाला. मुक्तीनं मागचं सगळं आवरून घेतलं. तिघं भाऊ अंगणात शेवग्याखाली बसले होते. तिथं ती आली. ती आलेली पाहताच ज्ञानेश्वरानं बोलायला सुरुवात केली. दादा, सोपान, मुक्ता, मला आज एक विचार तुमच्यासमोर मांडायचा आहे. त्या विचाराला तुमची अनुमती असेल, तर तो अमलात आणता येईल. विचार असा आहे, की आपण तिघंही भाऊ आता ज्ञानसाधनेच्या वयात आहोत. गुरूशिवाय जशी ज्ञानसाधनेला दिशा नाही, तसेच उपनयन संस्काराशिवाय ज्ञानसाधनेला अधिकार नाही, आकार नाही. आपल्या बाबांचीपण तीच इच्छा होती आणि त्यासाठीच त्यांनी देहान्त प्रायश्चित्त घेतलं. तेव्हा बाबांची ती इच्छा पूर्ण करणं, हे आपलं आद्य कर्तव्य आहे. आई-बाबांनी प्रायश्चित्त घेतलं आहे. म्हणजे अजाणतेपणी का होईना; पण हातून घडलेल्या अधर्माचं, क्षालन झालं आहे. तेव्हा ब्रह्मवृंदानी आपल्याला समाजात सामावून घ्यायला हवं आणि उपनयनाचा अधिकार द्यायला हवा. ते आपणहून देत नसतील, तर आपण तो मागायला हवा. तेव्हा आपण तिघं उद्या विनायकबुवांना घेऊन धर्मसभेत जाऊ. तिथं आपलं गाऱ्हाणं मांडू आणि धर्मसभेकडे न्याय मागू. बरेच दिवस माझ्या मनात हा विषय होता. दादा, तुमची अनुमती आहे ना? मी काही चुकीचं तर बोललो नाही ना? ज्ञानेशानं आपला विचार मांडला आणि निवृत्तीदादाला विचारलं.

निवृत्तीदादा होकारार्थी मान हलवत म्हणाला, 'नाही ज्ञानेशा! तू चुकीचं काहीच बोलला नाहीस. खरंतर माझ्याही मनात हा विचार उमटला होता; पण इतर काही विचारांमुळे राहून गेला. आपण उद्याच धर्मसभेत जाऊ आणि त्यांच्यासमोर आपलं म्हणणं मांडू. बघू या धर्ममार्तंड आपल्याला न्याय देतात का?' म्हणत निवृत्तीनं ज्ञानेशाला दुजोरा दिला. सोपान काहीच बोलला नाही. त्याचा चेहरा आकसला होता. कपाळावर बारीकशी आठी होती. 'काय झालं सोपाना? तुझा चेहरा असा का दिसतोय?' ज्ञानेशानं विचारलं. सोपानानं खाली मान घातली. आवंढा गिळला. जणू तो धाडस गोळा करत होता आणि एकवार नजर उचलून निवृत्तीदादाकडे बघून तो पुटपुटला, 'आणि धर्ममार्तंडांनी न्याय दिलाच नाही तर?' सोपानाचं बोलणं ऐकून दोघांनी चमकून एकमेकांकडे पाहिलं. बोलण्यासारखं काही नव्हतंच. मनाच्या एका कोपऱ्यात दबा धरून बसलेली, काळीज कुरतडणारी शंका सोपानानं बोलून दाखवली होती. दोघंही काहीच बोलले नाहीत. बोलली ती मुक्ता. 'मग आपण त्याहीपेक्षा वरच्या धर्मसभेत जाऊन न्याय मागू!' मुक्ताचं बोलणं ऐकून तिघांच्याही चेहऱ्यांवर दिलासा उमटला. खरंच! किती सहजपणे मुक्तानं यावर तोड काढली होती. हे कुणाच्याच लक्षात आलं नव्हतं. 'ठरलं तर मग! आपण उद्याच इथल्या धर्मसभेत जाऊ. त्यांच्यापुढे आपलं गाऱ्हाणं कथन करू आणि मग ठरवू काय करायचं ते!' असं सांगत निवृत्तीनं हा विषय संपवला. (क्रमशः)

**- सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ६ : आत्मसंयमयोग**

**आपुलेनि सुख दुःखे सर्वत्र । जे देखती जीव मात्र।**
**ते योगी परम पवित्र । ज्ञानिया तो ।।**
ज़ो आत्मौपम्य-बुद्धीनें सर्वत्र सम पाहतो ।
ज़सें सुख तसें दुःख तो योगी थोर मानिला ।।३२।।

अर्जुन उवाच ।

**अर्जुन म्हणे जो हा योग सांगितला ।**
**देवा तो म्यां नाही देखिला ।**
**चंचळ मन हे याला । निग्रह केवी घडे ।।**
तूं बोलिलास जो आतां साम्य-योग जनार्दना ।
न देखें स्थिरता त्याची ह्या चंचळ मनामुळें ।।३३।।

**हे मन चंचल बहु कृष्ण । इंद्रियाहूनि बळकट गहन।**
**वायूचे परी जाय घेऊन । हे निग्रह नव्हें ।।**
मन चंचळ हें कृष्णा हट्टी छळितसे बळें ।
धांवे वाऱ्यावरी त्याचा दिसे निग्रह दुष्कर ।।३४।।

श्रीभगवानुवाच ।

**अर्जुनासी म्हणितले मधुसूदने ।**
**संशय सांडी मन निश्चळ होय येणें ।**
**वैराग्य घेउनी अंतःकरणें । आणी योगाभ्यासे ।।**
अवश्य मन दुःसाध्य म्हणतोस तसें चि तें ।
परी अभ्यास-वैराग्यें त्याचा निग्रह होतसे ।।३५।।

**ज्याचें अंतःकरण स्थिर नाही । तो दुःखे करुनी**
**योगासी न पवे कहीं । ज्यासी आत्मा वश्य जाला**
**पाही । तो उपाय योगासी पावे सत्य ।।**
संयमाविण हा योग न साधे मानितों चि मी ।
परी संयमवंतास उपायें साध्य होतसे ।।३६।।

अर्जुन उवाच ।

**अर्जुन म्हणे श्रीकृष्णनाथा । भक्तियुक्त होउनी प्रयत्न**
**करितां । योगासी चळोनि सिद्धी न पवतां । जाय**
**त्यासी कोण गति ।।**
श्रद्धा आहे नव्हे यत्न योगांतूनि चळूनि ज़ो ।
मुकला योग-सिद्धीस जाय कोण्या गतीस तो ।।३७।।

**ब्रह्म मार्ग मूढपणें न पवतां ।**
**तयासी उभय भ्रष्ट म्हणती तत्त्वता ।**
**याचि गती विचारितां । नासे अभ्र जैसे ।।**
काय तो उभय-भ्रष्ट ब्रह्म-मार्गी भुलूनियां ।
नाश पावे निराधार फुटलेल्या ढगापरी ।।३८।।

**अर्जुन म्हणे श्रीकृष्णा । हा माझा संशय छेदावा जाणा**
**। तुज वेगळा या मना । नाहीं छेदितां संशयातें।।**
माझा संशय हा कृष्णा तूं चि फेडीं मुळांतुनी ।
फेडीलसा दुजा कोणी न दिसे चि तुझ्याविण ।।३९।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# ब्राह्मण आणि सरकारी अनुदान

**भाग १**

आज अंदाजे महाराष्ट्राची लोकसंख्या १३ कोटी आहे आणि त्यापैकी ब्राह्मण ८% ते १०% आहेत म्हणजे अंदाजे १.१७ कोटी. आत्तापर्यंत ब्राह्मणांना शासनातर्फे कोठेच काही सवलत नव्हती. ना सरकारी नोकरीत आरक्षण, ना शिक्षणात , ना शाळा / कॉलेजच्या फीमध्ये सवलत, ना कुठल्याही प्रकारचे उद्योगांकरिता आर्थिक साहाय्य.

गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या समाजाने वरील विषम शासकीय वागणुकीकरता आंदोलने केली होती. आंदोलनाच्या खालीलप्रमाणे वेगवेगळ्या मागण्या होत्या.

१) ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह. २) सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्य करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात परशुराम भवन. ३) ब्राह्मण पुजाऱ्यांना मासिक रु. ५००० मानधन. ४) ब्राह्मणांना विविध मंदिरांत नियुक्ती करून पूजेचे अधिकार. ५) वंशपरंपरागत हस्तगत असलेल्या इनामी जमिनीचा मालकी हक्क कायमस्वरूपी हस्तांतरित. ६) ब्राह्मण समाजासाठी विशेष सुरक्षा कायदा. ७)शैक्षणिक आणि आर्थिक साहाय्य.

आता मात्र वरील चित्र बदलले आहे .

२३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंत्रीमंडळाने ब्राह्मणांकरता परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या मंडळाला शासन रु. ५० कोटी भाग भांडवल देणार आहे . या मंडळाचा उद्देश समाजाला, शिक्षण आणि उद्योगाकरता आर्थिक मदत करणे हा राहील. अर्थात अजून हे महामंडळ कार्यान्वित व्हायचे आहे.

अशा प्रकारच्या मंडळांवर टीका करण्यात येते की राजकीय पुढारी आणि पक्षनिष्ठ यांची सोय लावण्याकरता यांचा उपयोग करण्यात येतो , आज शंभराहून अधिक विकास महामंडळे अस्तित्वात आहेत, पण ती विशेष परिणामकारक नाहीत. हे म्हणणे संपूर्ण खरे नाही. आपण अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उदाहरण विचारात घेऊ.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे महामंडळ प्रामुख्याने मराठा समाजाकरता काम करते. पण ज्या जाती / गटांसाठी कोणतेही मंडळ कार्यरत नाही अशा जाती / गट सुद्धा यांच्या योजनांचा लाभ घेऊ शकतात. म्हणजे आपला समाजही आलाच.

यांची वैयक्तिक कर व्याज परतावा योजनेची (कमाल कर्ज रु. १० लाख ).

पुढील माहिती मी आपणासमोर ठेवतो.

१) ज्या उमदेवारांना बँका स्वयंरोजगार उभारणीकरता कर्ज देतात त्याचा व्याज परतावा महामंडळाकडून केला जातो. २) कर्ज हे बँकांनी द्यावयाचे आहे आणि त्यांच्या शर्तीनुसार. महामंडळाचे कोठलेही बँकांवर बंधन नाही. ३) उद्योग पूर्णतः महाराष्ट्र राज्यातील असला पाहिजे आणि यापैकी एक – (अ) कृषी संलग्न व पारंपरिक उपक्रम, (ब) लघु आणि माध्यम उद्योग – i) उत्पादन, ii ) व्यापार, iii) विक्री (क) सेवा क्षेत्र, ४) लाभार्थीसाठी अटी व शर्ती – (अ) महाराष्ट्राचा रहिवाशी असावा, (ब) त्याचे कर्ज खाते आधार लिंक असावे, (क) वय १८ ते ६०, (ड) वेबसाइट वर नाव नोंदवणे अनिवार्य. (इ) कर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. ८. लाखाच्या आत असावे, ५) इतर शर्ती – (अ) कर्जदाराने अर्ज करतेवेळी कुठलाही शासकीय योजनांचा लाभ घेतला नसावा. (ब) कर्जदार कोणत्याही बँकेचा / वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा, (क) एका व्यक्तीला केवळ एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल. (५) नाव नोंदणी – कर्जदारांनी अधिकृत वेबपोर्टलवर अर्ज सादर करणे बंधनकारक असेल. प्रस्ताव मंजूर झाल्यावर कर्जदारास संगणकीकृत मंजूरीपत्र (letter

Of Intent) दिले जाईल, ६) परताव्याच्या अटी - (अ) जर कर्जदाराने मध्येच नियमित कर्जफेड केली नाही तर व्याज परतावा दिला जाणार नाही, (ब) कर्जदाराने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरु असल्याचे किमान दोन फोटो अपलोड करावेत, ७) व्याज परत करण्याची पद्धत - कर्जदाराने वेळेत कर्जाचे हप्ते व व्याज भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत) त्याच्या आधार लिंक खात्यात दरमहा मंडळातर्फे जमा केली जाईल.

या योजनेची अंमलबजावणी अगदी यशस्वी रित्या ऑनलाईन चालू आहे .

ऑनलाईन अर्ज करताना उमेदवारास खालील दस्तऐवज अपलोड करणे आवश्यक असेल

१) आधार कार्ड, २) रहिवासी पुरावा - अद्ययावत लाईट बिल /अद्ययावत टेलिफोन बिल / अद्ययावत गॅस कनेक्शनचे पुस्तक / तहसीलदाराने दिलेला रहिवासी पुरावा / रेशन कार्ड ची प्रत / अद्ययावत पासपोर्ट / भाडेकरार, ३) तहसीलदाराने दिलेला अद्ययावत उत्पन्नाचा दाखला / अद्ययावत पतिपत्नींचे आय. टी . आर., ४ ) जातीचा दाखला

वरील योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे - १) उमेदवाराच्या उत्पन्नात त्याच्या पत्नीचे उत्पन्न धरले जाते , पण आई वडिलांचे नाही. २) बँकांवर कुठल्याही प्रकारे कर्ज मंजूर करण्याचा दबाव नाही . ३) सगळी प्रक्रिया ऑनलाईन आहे, कुठलाही दलाल नाही.

आजकाल मराठा समाज सोडून इतर लोकांचे अर्ज आण्णासाहेब मंजूर करत नाही असे ऐकण्यात आहे . पण वेबसाईटमध्ये मार्गदर्शक सूचनांमध्ये असा स्पष्ट उल्लेख आहे - ज्या जाती / गटांसाठी कोणतेही महामंडळ कार्यरत नाही अशा जाती / गटातील उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत .

याशिवाय मला येथे नमूद करायला आनंद होतो की खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरता म्हणजे गरीब ब्राह्मणांकरता दुसरी एक संस्था पण कार्यरत आहे. नाव , Acdemy of Maharashtra Reserch , Upliftment and Training (अमृत) या संस्थेच्या पण खालील आर्थिक साहाय्य योजना आहेत - १) अमृत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, २) परशुराम गट व्याज परतावा योजना

अर्थात अमृत संस्थेच्या इतर शर्तींबरोबर सर्वसाधारण लाभार्थींने आर्थिक निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे. तो म्हणजे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाखाच्या आत हवे.

याशिवाय वर उल्लेखलेली Acdemy of Maharashtra reserch, upliftment and training (अमृत) ऑगस्ट २०१९, मध्ये शासनाने स्थापन केली आहे, जी आपल्या समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल अशा तरुण तरुणींसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम राबवते. मदतीकरता कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची अट सर्वसाधारणपणे रु. आठ लाख आहे. त्यांच्या वेबसाईट www. mahaamrut. org. in याला भेट दिली तर त्यांच्या सगळ्या योजनांची विस्तृत माहिती मिळेल. खालील पाच बाबींमध्ये अमृत कार्यरत आहे.

१) शैक्षणिक अर्थसहाय्य A.I. I. M. S., I. I. T., I. I. T.I., I. I. M. मध्ये प्रवेश घेणाऱ्याना अर्थसहाय्य,

२) स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन आणि अर्थसहाय्य खालील परीक्षांकरिता - (अ) UPSC स्पर्धा परीक्षा, नागरी, वनसेवा, अभियांत्रिकी सेवा, (ब) MPSC गट अ/ब (राजपत्रित आणि अराजपत्रीत)

३) रोजगारक्षम कौशल्य अर्थ सहाय्य - (अ) स्वयंरोजगार प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम, (ब) शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षा, (क) कृषी आधारित उद्योग सुरु करण्याचे प्रशिक्षण, (ड) ड्रोन ऑपरेटर रिमोट पायलट प्रशिक्षण

४) औद्योगिक व उन्नत कौशल्य विकास - (अ) तांत्रिक रोजगारक्षम प्रशिक्षण, (ब) माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स तथा उच्च कार्यक्षमता संगणक प्रशिक्षण, (क) भाऊ इन्क्युबेशन प्रोग्रॅम .

५) आर्थिक विकास - (अ) व्याज परतावा योजना, (ब) परशुराम गट व्याज परतावा योजना

या सगळ्या योजना त्यांच्या शर्ती आणि अटी

काही इथे देता येणार नाहीत पण काही योजना मात्र मी उद्धृत करतो

१) ज्या विदयार्थ्यांनी A.I. I. M.S. , A.I.I.T. , I.I.M., I.I.I.T. मध्ये अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतला असेल त्यांना , अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत , दरमहा रु. १०००० , अर्थ सहाय्य केले जाते , अट फक्त दरवर्षी उत्तीर्ण होणे ही असते .

२) राज्यस्तरीय आणि केंद्रीय लोक सेवा आयोगाच्या परीक्षांबाबत. पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, मुख्य परीक्षेची तयारी करण्याकरता रु. १५००० आणि मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, मुलाखतीची तयारी करण्याकरता रु . २५०००

३) संगणक टन्क लेखनाची परीक्षा पास झाल्यावर रु. ६५०० लघुलेखनाची परीक्षा पास झाल्यावर रु. ५३००

४ ) ड्रोन ऑपरेटर रिमोट कंट्रोल प्रशिक्षण कृषी महात्मा फुले विद्यापीठ, राहुरी यांच्यातर्फे देण्यात येते. संपूर्ण प्रशिक्षण शुल्क – रु. ३५००० आणि जर निवासी प्रशिक्षण घेतले असेल तर, निवास आणि भोजन करता रु. ६००० अदा केले जाते.

**जातीचा दाखला**

आता वर सांगितल्याप्रमाणे ब्राह्मणांनाही जातीमुळे फायदा होऊ शकतो. म्हणून आपण आता जातीचा दाखला मिळवणे जरुरीचे वाटते. आपण जातीचा दाखला हा ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने काढू शकतो.

ऑफलाईन पद्धतीने जर जातीचा दाखला काढायचा असेल तर तुम्हाला तुमच्या जवळच्या महसूल कार्यालयामध्ये जाऊन अर्ज घेऊन तिथे तुम्हाला तो अर्ज भरायला लागेल. त्यानंतर तुमच्या जातीचा दाखला हा दहा ते पंधरा दिवसाच्या आत मिळून जाईल. तसेच तुम्ही ऑनलाईन देखील जात प्रमाणपत्र हे काढू शकता. त्यासाठी तुम्हाला महाराष्ट्र सरकारच्या आपले सरकार या संकेत स्थळावर जावे लागेल व तिथे जाऊन सर्व कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावी लागतील त्यानंतर काही दिवसात जात प्रमाणपत्र हे मिळून जाईल . या पद्धतीने जात प्रमाणपत्र काढण्यासाठी तुम्ही यू ट्यूब वरती प्रत्यक्ष व्हीडिओ पहा आणि त्यानंतरच ऑनलाईन पद्धतीने अर्ज करा.

जात प्रमाणपत्रासाठी खालील कागदपत्रे लागतात.

१) अर्जदाराचा फोटो, २) अर्जदाराचा राहण्याचा पुरावा (स्थायी रहिवासी प्रमाणपत्र/ लाईट बिल/ रेशन कार्ड /जमीन दस्तऐवज, ३) अर्जदाराच्या जन्मतारखेचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र / आधार कार्ड / पॅन कार्ड, ४) वडिलांचे जात प्रमाणपत्र, ५) राज्य सरकारने अधिसूचित केलेल्या अधिकृत जाती / जमाती / समुदाय संस्थेची शिफारस ( वडिलांचे जात प्रमाणपत्र नसल्यास) (याकरता वडिलांचा/आजोबांचा शाळा सोडल्याचा दाखला, ज्यात जातीचा उल्लेख आहे, तो महत्वाचा ठरेल.

जात प्रमाणपत्र हा एक कागदोपत्री पुरावा आहे जो प्रमाणित करतो की एखादी व्यक्ती विशिष्ट जातीची आहे, ज्याचा उपयोग विविध प्रकारचे फायदा मिळवायला होतो.

समारोप करताना मला असे म्हणावेसे वाटते –

१) आपलेही लोकसंख्यातील प्रमाण १० टक्के आहे. आपण जर सर्व एकत्र आलो तर राजकारणात दबाव गट बनू शकतो, २) आपल्याकरता परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना ही आनंदाची बातमी आहे, परंतु आपण पाठपुरावा करून ती कार्यान्वित केली पाहिजे, ३) आपण सगळ्यांनी जातीचा दाखला मिळवता पाहिजे, ४) आपल्या ज्ञाती संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी सभा घेऊन आपल्या उपलब्ध असलेल्या सरकारी फायद्यांची आपल्या समाजाला माहिती करून द्यायला हवी आणि या सर्व सरकारच्या सवलतींचा पुरेपूर लाभ घ्यावा. ५) आपल्या ज्ञाती संस्थेने योग्य ती कारवाई करून आपली एखाद्याच्या जातीबद्दलची शिफारस जाती प्रमाणपत्रकरता ग्राह्य धरण्यात येईल अशी अनुमती मिळवली पाहिजे. (माझ्या माहितीप्रमाणे कुणबी समाजोन्नती संघ, परळ, मुंबई यांना तशी अनुमती आहे )

बँकिंग क्षेत्रात ५० वर्षे घालवूनही मला, अमृत या संस्थेची माहिती गेल्या काही दिवसापूर्वीच मिळाली. ती आपल्या समाजाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त वाटली म्हणून हा लेखन प्रपंच. अमृतच्या प्रत्येक योजनेची माहिती, तपशीलवार वाचकांसमोर मांडण्याचा मानस आहे. जर हा लेख वाचल्यावर आपल्या ज्ञातिबांधवानी अमृतच्या योजनांचा फायदा घेतला तर लेख लिहिल्याचे सार्थक होईल.

आपल्या प्राचीन / अर्वाचीन इतिहासाच्या दाखल्याप्रमाणे ब्राह्मण लोकांनीच या देशात शिक्षण, राजकारण, समाजकारण, समाजसुधारणा, अर्थकारण या सर्व क्षेत्रात नेतृत्व केले आहे. आज आपल्या समाजाला एकूणच मरगळ आल्यासारखी दिसत आहे. वरील सर्व क्षेत्रामध्ये ब्राह्मणांचे प्रतिनिधित्व झाकोळले दिसत आहे. पण मी वर नमूद केलेल्या सर्व योजनांचा लाभ घेऊन आपला ब्राह्मण समाज सहजच पुन्हा आघाडीवर येऊ शकेल अशी मला खात्री आहे .

**– श्रीकांत शिंत्रे**

मोबा. ९६१९१९६७०५

## अभिमानास्पद !

**पान ११ वरून...**

आम्ही जेव्हा दवाखाना सुरू तेव्हा शंभर टक्के अलोपॅथीची औषधे वापरत होतो. तेव्हा असं लक्षात येई की काही रुग्णांमध्ये, काही तक्रारींमध्ये, औषधे देऊन सुद्धा काहीच फरक पडत नसे. त्यामुळे हळूहळू मी आयुर्वेदाचा विचार करीत गेले. आयुर्वेदाचा सैद्धांतिक भाग माझ्या चांगला लक्षात होता. परंतु शिक्षण घेत असताना, रुग्णांवर आयुर्वेदिक चिकित्सेचे परिणाम, त्यातील अनुभव, फारसे बघायला मिळाले नव्हते. अशा प्रकारे हळूहळू नकळत मी आयुर्वेदाकडे वळले. रुग्णांच्या तक्रारींना अनुसरून, एक एक करत बरीच आयुर्वेदिक चूर्णे दवाखान्याच्या कपाटात विराजमान होऊ लागली.

सर्दी नाकातून बाहेर पडण्यासाठी आधुनिक वैद्यकामध्ये फारशी परिणामकारक उपाययोजना मला मिळाली नाही. त्यामुळे काही प्रयोगातून कपाळावर लावण्याचा लेप तयार झाला. ज्यायोगे सर्दी पातळ होऊन नाकातून बाहेर पडू लागली. आणि अर्थातच रुग्णाला आराम वाटू लागला.

काही दिवसांनी खोकल्यासाठी काढा तयार केला गेला. अशाप्रकारे अनेक विकारांवर अनेक औषधे तयार झाली.

शोथघ्न लेप गोळीची कल्पना कशी सुचली, काहीच आठवत नाही. परंतु या गोळीने आमचे रुग्ण आणि आम्ही सर्वांनाच समाधान दिले.


**– सुश्मिता गाडगीळ**

मोबा. ९४२१२९०४७७

**दिनविशेष (फेब्रुवारी २०२५) शोभननाम - क्रोधीनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**माघ - फाल्गुन १९४६**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**शनिवार दि. १ :** गणेश जयंती, **मंगळवार दि. ४ :** जागतिक सूर्यनमस्कार दिन, रथसप्तमी, **रविवार दि. ९ :** गोंदवलेकर महाराज जयंती, **सोमवार दि. १० :** विश्वकर्मा जयंती, **रविवार दि. १६ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.४९), **बुधवार दि. १९ :** छ. शिवाजी महाराज जयंती, **गुरुवार दि. २० :** श्री गजानन महाराज प्रकट दिन, **शुक्रवार दि. २१ :** जागतिक मातृभाषा दिन, **शनिवार दि. २२ :** रामदास नवमी, **रविवार दि. २३ :** संत गाडगेबाबा जयंती, **सोमवार दि. २४ :** जागतिक मुद्रण दिन, **बुधवार दि. २६ :** महाशिवरात्री, **गुरुवार दि. २७ :** मराठी भाषा गौरव दिन, **शुक्रवार दि. २८ :** राष्ट्रीय विज्ञान दिन.

# ऋतू बरवा

वाचकहो... भारतीय संस्कृती.. सण उत्सव..परंपरा यांचा थेट संबंध हवामान, निसर्ग, ऋतू या सगळ्यांशी आहे..आपण वेगवेगळ्या ऋतूंचा परिणाम, आहार ..यावर बोलतोच पण या सगळ्या घटकांचा आपल्या आयुष्यावर... मनावर, शरीरावर देखील किती परिणाम होत असतो..हे जाणून घेऊया..साहजिकच या सगळ्याचे साद पडसाद सामाजिक आर्थिक घडामोडींवर पण होतोच..तो ही संदर्भ जाणून घेऊ... यासाठी ऋतू सांगे ही लेखमाला आपण घेऊन येतोय....

**अम्बर उतरा है, कोहरा बन**
**धरती संग आतुर आलिंगन**
**सकुची धरती नीरवता संग**
**हुलसित मधुमय है, मधुर मिलन।**
**पक्षी असंख्य उतरे प्रवास**
**सरवर पर उमड़े, ध्वनि सु हास**
**सारस की पंक्ति धवल उज्वल**
**उड़ती नभ, बिखरे ज्यों बादल।**
**आगमन निकट, स्वागत बसंत**
**हेमन्त, रच रहा दिग दिगंत**
**धरती को प्रकृति रचे नव-नित**
**विलसी, हुलसी, निखरीं सुरभित।**

रमेश शुक्ल यांनी अतिशय सुंदर वर्णन हेमंत ऋतूचे केले आहे.

भारतीय दिनदर्शिकेनुसार हेमंत मार्गशीर्ष-पौष महिन्यात येतो. हेमंत ऋतू हा हिवाळापूर्व हंगाम म्हणूनही ओळखला जातो आणि त्याचे वैशिष्ट्य म्हणजे थंड आणि कोरडे हवामान होय. मार्गशीर्ष-पौष हे महिने अनुक्रमे नोव्हेंबर-डिसेंबर आणि डिसेंबर-जानेवारीमध्ये येतात.

ऋतू म्हणजे पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे वायुमंडळात होणारे हवामान बदल.

प्रत्येक ऋतू आपल्या विशिष्ट हवामानामुळे जीवनशैली, कृषी, आरोग्य आणि सांस्कृतिक सण यावर प्रभाव टाकतो. ऋतूंच्या बदलांमुळे वातावरणीय परिस्थिती आणि संसाधनांचे व्यवस्थापन आवश्यक असते, ज्यामुळे लोकांची जीवनशैली आणि त्यांच्या दैनंदिन कामकाजावर प्रभाव पडतो.प्रत्येक ऋतूच्या वेळी हवामानातील बदलामुळे विविध जलवायू परिस्थिती अनुभवता येते.

प्रदेशागणिक हवामानबदलामुळे ऋतूंची नेमकी संख्या बदलते. ही विभागणी मुख्यतः तापमान आणि पाऊस या घटकांवर आधारित आहे. परंतु प्रदेशागणिक हे घटकदेखील बदलतात. उदा. उष्ण कटिबंधातील लोक फक्त तापमानाच्या आधारावर ऋतू ठरवतात, कारण तेथे पाऊस वर्षभर पडत असतो. समशीतोष्ण कटिबंध दोन किंवा तीन ऋतू मानतो तर शीत कटिबंध प्रदेशांमध्ये केवळ दोनच ऋतू असतात. मात्र भारतामधील वर्ष तीन मुख्य ऋतूंमध्ये विभागले गेले आहे: उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा, तर उपऋतू सहा - वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर.शरद आणि हेमंत या ऋतूंच्या संधिकाळाला आयुर्वेदाने नितांत महत्त्व दिलेले आहे, त्याला 'यमदंष्ट्रा' म्हटले आहे. कोणत्याही दोन ऋतूंचा संधिकाळ हा आरोग्यासाठी हितकर नसतोच, तसाच तो या शरद व हेमंत या उभय ऋतूंचा सुद्धा नाही. मात्र या ऋतू संधिकाळाला आपल्या आरोग्य- परंपरेने यमदंष्ट्रा संबोधून त्याचे गांभीर्य आपल्याला सांगितले आहे.

ऋतूनुसार सर्व महिन्याचे आणि सण-उत्सवाचे महत्व आहे. पौष महिना जेव्हा येतो तेव्हा हिवाळा ऋतू सुरू असतो, अशात थंडी वाढलेली असते. यामुळे या महिन्यात सूर्यदेवाची पूजा करण्याचे महत्व शास्त्रात सांगितले आहे. तसेच, गरम पदार्थांचा

आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते.

हेमंत ऋतू म्हणजेच दक्षिणायनामधला शेवटचा ऋतू. या काळात पृथ्वीच्या उत्तर भागात असणाऱ्या भारतासारख्या देशामध्ये थंड वातावरण असते. बाहेर थंड आणि रुक्ष असे वारे वाहत असल्यामुळे, शरीरातील अग्नी आतल्या आत कोंडला जातो आणि चांगलाच प्रदीप्त झालेला असतो.

वात-पित्त-कफ हे शरीरातील त्रिदोष या हेमंत ऋतूमध्ये सम स्थितीमध्ये असतात.
म्हणून सर्वात चांगले आरोग्य हेमंत ऋतूमध्ये माणसाला सहजपणे प्राप्त होते. अशा या आरोग्यदायी हेमंत ऋतूमध्ये उत्तम प्रकारचा व्यायाम, अभ्यंग व पौष्टिक आहार घेऊन शरीरामध्ये शक्ती कमवायची असते . या जमवलेल्या शक्तीचा उपयोग, पुढे उत्तरायणात येणाऱ्या वसंत , ग्रीष्म, वर्षा या ऋतूमध्ये होणाऱ्या आजारांना तोंड देण्यासाठी होतो .हेमंत ऋतूच्या आगमनाबरोबर थंडीची सुरुवात झाली की सगळीकडे एक प्रकारची शिथिलता जाणवायला लागते. कडाक्याच्या थंडीत माणसं गोठल्यासारखी होतात. निसर्गामधील पानं-झाडंसुद्धा जणू स्थितप्रज्ञ होऊन संन्यस्त झाल्यासारखी वाटू लागतात. शिशिरात झाडांची पानं गळायला लागली की बोडखी झालेली झाडं आणि खाली पडलेला पानांचा खच बघून उगाचच मनामध्ये एक विषण्णता निर्माण होते. वसंतऋतूमध्ये निसर्गजीवन पुनरुज्जीवनाच्या वाटेनं मार्गक्रमित होतं. वर्षभरात सहा ऋतूंचं चक्र संपूर्ण निसर्गामध्ये संक्रमण आणित असतं. दरवर्षी नि निरंतर चालणारं हे ऋतुचक्र अगदी ठरल्यावेळी आपले परिणाम साध्य करीत असतं

बदलणाऱ्या या ऋतूंचा परिणाम मानवी शरीरस्वास्थ्यावर जसा होतो, तसा तो मनोविश्वावर होतो. प्रत्येक ऋतूच्या सोबत निसर्गात बदलणारे रंग कधी मनाला हुरहुर लावून जातात तर वसंतात फुलून येणारी नवी पालवी-पळसफुलं नवा उत्साह नि रोमहर्षकता घेऊन येतात. खरं म्हणजे प्रत्येक ऋतू हे मानवी मनातील भावविश्व विविध अंगाने व ढंगाने जगण्याचे संदर्भ देवून जातात.

ऋतू बदलाबरोबर खाण्यापिण्याच्या सवयी आणि कपड्यांमध्येही बदल होतो.

पिकांच्या व फळांच्या विविधतेतही बदल होत आहेत.हिवाळ्याच्या काळात आपल्याला चांगल्या चयापचय प्रक्रियेचा आशीर्वाद मिळतो म्हणजे आपण कमीत कमी प्रयत्नांनी जास्त कॅलरी कमी करू शकतो.

हवामान थंड आणि सुखद असते. रात्रीच्या थंडपणामुळे शरीराला विश्रांती मिळते आणि आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असते.

हिवाळ्यात तापमान कमी होऊन थंड हवामान अनुभवता येते. उबदार कपडे आणि गरम कपड्यांची आवश्यकता असते. हवामान थंड आणि सुखद असते, पण रात्रीच्या वेळी तापमान अधिक कमी होऊ शकते. काही ठिकाणी थंडीचा प्रभाव अधिक असतो.

**जलवायू –** हिवाळ्यात जलवायू शुष्क असतो. त्यामुळे त्वचा सुकण्याची समस्या उद्भवू शकते. आर्द्रतेची पातळी कमी होते.

हिवाळ्याच्या या काळात आंबट, खारट आणि गोड रसाळ अन्न घ्यावे. पचायला जड, पौष्टिक, भरपूर आणि तुपापासून बनवलेले पदार्थ जास्त प्रमाणात सेवन करावे.

या ऋतूत खाल्लेल्या अन्नपदार्थातून वर्षभर शरीराच्या आरोग्याचे रक्षण करणारा साठा जमा होतो. त्यामुळे उडीदपाक, सोनपाक किंवा च्यवनप्राश इत्यादी तिखट पदार्थ वापरावेत.

जे पदार्थ पचायला जड तसेच उष्ण व स्निग्ध असतात, असे पदार्थ घ्यावेत. दूध, तूप, लोणी, गूळ, खजूर, तीळ, कोपरा, सुका मेवा आणि चरबी वाढवणारे इतर पौष्टिक पदार्थ या ऋतूत सेवन करणे योग्य मानले जाते.

या दिवसात थंड अन्न घेऊ नये, तर थोडे गरम व तूप-तेलाचे प्राबल्य असलेले अन्न घ्यावे.

हिवाळ्याच्या ऋतूमध्ये जठराची आग खूप तीव्र असते, त्यामुळे यावेळी घेतलेला पौष्टिक आणि सशक्त आहार वर्षभर शरीराला तेज, बल आणि पुष्टता देतो.

खगोलीय ज्योतिष शास्त्राप्रमाणे पौष महिन्यात अशुभ काहीही नसून पौष हा हिंदू कॅलेंडरचा दहावा महिना आहे ज्याला खूप धार्मिक महत्त्व आहे. हे विधी, प्रार्थना आणि धर्मादाय कृत्यांसाठी अत्यंत शुभ मानले जाते. या महिन्यात थंडीची तीव्रता वाढत असल्याने मानसिक आणि शारीरिक आरोग्य राखणे अत्यावश्यक बनते.

मराठी महिन्यांनुसार मार्गशीर्ष आणि पौष महिन्यातील दत्त जयंती, श्रीकृष्णाने जेव्हा गीता सांगायला सुरुवात केली ती गीता जयंती येते.

सूर्याची उपासना आणि शेतात गव्हाच्या ओंब्या डुलू लागतात. कोवळी पिके पाहून सृजनाची भावना होते. बऱ्याचशा झाडांना आता फळ, शेंगा लगडलेल्या दिसून येतात. लवकरच ही चांगली पक्व होणार असतात.

*॥ विचार पुष्प ॥*

*मन चिंती ते वैरी न चिंती असे आपल्याकडे म्हटले जाते आणि आपल्या प्रत्येकाला याचा अनुभव अनेकदा येतो. आपले मन आपल्याला भूतकाळात तरी घेऊन जाते नाहीतर भविष्यकाळात तरी नेते. आणि भविष्यात नेमक्या नको त्या गोष्टी चिंतल्या जातात. जीवन मस्त व छान आहे. आहे तसे स्वीकारून ते आनंदी बनविण्याचा प्रयत्न करू. एकमेकांना आधार देऊ व चिंतामुक्त जीवन जगण्याचा प्रयत्न करू !*

संक्रांत, बैसाखी, ओणम अश्या वेगवेगळ्या नावाने पिक, अन्नधान्याबद्दल कृतज्ञता दाखवली जाते. तीळ-गुळाचा गोडवा आणि स्निग्धता नात्यांत उतरावा अशी कामना केली जाते.

निसर्गाचे चक्र समजून घेऊन त्याप्रमाणे जर आपण आपला आहार-विहार जुळवून घेतला, नैसर्गिक नियम पाळले, तर शरीर स्वतःच अनेक रोगांचा प्रतिकार करते.

दिवसात बाजारात सहज फेरफटका मारल्यावर, वेगवेगळ्या रंगीबेरंगी, ताज्या, रसरशीत भाज्या व फळांनी गच्च भरलेल्या टोपल्या बघितल्या, की काय घेऊ आणि किती घेऊ असे होऊन जातं.लालम् लाल टोमॅटो, गाजरं, हिरवेगार-पालक, मुळा, मेथी, शेपू, टरारलेल्या मटारच्या, तुरीच्या शेंगा, मोठमोठे रसरशीत पेरू, आवळे, काळे शिंगाडे, नारंगी रंगाची संत्रीअशी विविधता दिसून येते.

बदलणाऱ्या या ऋतूंचा परिणाम मानवी शरीरस्वास्थ्यावर जसा होतो, तसा तो मनोविश्वावर होतो. प्रत्येक ऋतूच्या सोबत निसर्गात बदलणारे रंग कधी मनाला हुरहुर लावून जातात तर वसंतात फुलून येणारी नवी पालवी-पळसफुलं नवा उत्साह नि रोमहर्षकता घेऊन येतात. खरं म्हणजे प्रत्येक ऋतू हे मानवी मनातील भावविश्व विविध अंगाने व ढंगाने जगण्याचे संदर्भ देवून जातात.

**- वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

**मंगळवार, दि. 11 पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर, 0231-2546585**

# अडाणीपणाची कमाल !

मिसेस कोणाला म्हणतात? माहित आहे? मिस्टर कोणाला म्हणतात? माहित आहे? मॅडम शब्दाचा अर्थ काय आहे? हॅलो कशाला म्हणतात? ५. अकॅडमी म्हणजे काय? ६.कॉन्व्हेंटचा अर्थ काय आहे? यांचा खरा अर्थ काय आहे? आणि हे सर्व शब्द भूषणाने वापरले जातात तेही कुठे?

उत्तर –

१. युरोपीय देशात पती पत्नी आयुष्यभर कधीच एकत्र राहू शकत नाही, ही ब्रिटीशांची हजारो वर्षांची परंपरा आहे. घटस्फोट जणुकाही करायचेच असतात. धर्मपत्नीला सोडून ज्या स्त्रियांशी संबंध येतात, तिला मिसेस म्हणतात.

आणि

२. आपला नवरा सोडून ज्याच्याशी संबंध येतात, त्याला मिस्टर म्हणतात. आपल्या संस्कृतीमधे किती सुंदर शब्द वापरलाय, श्रीमती !

श्रीमती – श्री म्हणजे लक्ष्मी, मती म्हणजे बुद्धी. म्हणजे लक्ष्मी आणि सरस्वती जिच्यामधे एकत्र असतात, ती श्रीमती.

आमची संस्कृती सोडून आम्ही आपल्या धर्मपत्नीची ओळख माझी मिसेस म्हणून करून द्यायला सुरवात केली. मानसिक गुलामी एवढी जास्त की, शब्दापेक्षा, अर्थापेक्षा इंग्रजीत ओळख करून द्यायची हौस जास्ती! अर्थ माहित नाही, म्हणून लाजही वाटत नाही.पण ज्याला अर्थ माहित आहेत, त्या विद्वानाने काय अर्थ काढायचे ?

३. युरोपमधे मॅडम कोणाला म्हणतात ?

वेश्यागृहांना संचालित करणारी जी मुख्य बाई असते, तिला मॅडम म्हणण्याची पद्धत आहे.

भारतात कोणाला मॅडम म्हणतात ?

आम्ही आमच्या शिक्षिकांना मॅडम म्हणतो, अनोळखी स्त्रियांना हाक मारताना मॅडम म्हणतो. एवढेच नाहीतर कधीतरी आपल्या बहिणीला, आत्तेला, मावशीला पण आदराने मॅडम म्हणतो. शिवीसारखा असलेला शब्द या गुलामगिरी मुळे आदरामधे बदलला गेला. किती अर्थाचे अनर्थ होतात,पण लक्षात घेतं कोण?

४. आम्ही दूरध्वनीवरील संभाषणाची सुरुवात हॅलो या शब्दाने करतो.

शब्दांचा अर्थ माहित नसतानाही केवळ इंग्रजी बोलण्याच्या प्रतिष्ठेसाठी केलेल्या गुलामगिरीचे हे आणखी एक उदाहरण..!! दूरध्वनी यंत्राचा शोध ज्याने लावला त्या ग्राहम बेलने हे यंत्र सुरु होताच पहिला फोन आपल्या प्रेयसीला लावला. तिने फोन उचलताच त्याने तिला हाक मारली... हॅलो !!

हॅलो हे ग्राहम बेलच्या प्रेयसीचे नांव होते. आम्ही मात्र कुणालाही फोन लावला तरी सुरुवात ग्राहम बेलच्या प्रेयसीचे नांव घेवून संभाषणाची सुरूवात करतो. आहे की नाही अज्ञानातील गुलामगिरी....!!

५. अकॅडमीचे अकादमी हे रुपांतरही असाच आमचा मूर्खपणा आहे.

अकॅडमस नावाच्या व्यक्तीच्या अंगणात प्लुटोची व्याख्याने होत होती.हे ज्ञानसत्र अक्ॅडमसच्या अंगणात चालते म्हणून ती अकॅडमी...!! आम्ही त्याचे रुपांतर केले अकादमी...!!

खरं तर आपण प्रबोधिनी किंवा प्रबोधिका म्हणणे अधिक अर्थपूर्ण आहे. पण आम्हाला लाज वाटते अशी नांवे द्यायची. विकृत चालेल पण संस्कृत नको, ही आणखी एक मानसिक गुलामगिरी ....!!

६. पाश्चिमात्य देशात घटस्फोट झाले की मुलांना कुणी सांभाळायचे?असा प्रश्न आहे. तिथं अशा मुलांसाठी ज्या संस्था आहेत त्यांना कॉन्व्हेंट म्हणतात.

आम्ही इंग्रजी शाळात मुलांना घातलंय हे अभिमानाने सांगण्यासाठी माझं मूल कॉन्व्हेंट मध्ये आहे हे कॉलर ताठ करुन सांगतो....!!

लाजिरवाण्या गुलामगिरीचे हे उदाहरण ....!!!

असे खूप शब्द आहेत. ज्यांचे अर्थ माहित नाहीत पण आपण ते वापरतो कारण काय?

तर मातृभाषेची लाज वाटते आणि इंग्रजीत प्रगती वाटते. म्हणूनच विनंती करतो मराठी बोला मराठीत शिकवा व आपली संस्कृती टिकवा.

(आंतरजालावरून साभार)

## – कोल्हापूर चित्पावन संघातर्फे बोडण सोहळा –

आपल्या समाजाचा कुलाचार म्हणजे बोडण सोहळा !

यावर्षी संस्थेतर्फे सार्वजनिक बोडण सोहळा रविवार, दि. २ मार्च २०२५ रोजी संस्थेचे 'रमा–दामोदर सभागृह' येथे करणेचे ठरवत आहोत. बोडणाची सर्व व्यवस्था संस्थेतर्फे करणेत येणार असून खर्च प्रतिबोडण रु. ३५००/– इतका व एक जादा पान प्रसाद भोजन रु. २५०/– इतका येईल.

(एका बोडणास ४ सवाष्ण व १ कुमारिका – प्रसाद भोजन समाविष्ट)

**संपर्क : कोल्हापूर चित्पावन संघ, मंगळवार पेठ, कोल्हापूर. फोन : ०२३१–२५४६२२५**


**श्रीमती वासंती लिमये : ९१५८८५९६०३ ✻ सौ. संगीत आपटे : ८१४९५८००३४**

## सौ. मंजुश्री गोखले यांच्या ५० व्या पुस्तकाचे पुणे येथे प्रकाशन



आपल्या नवस्नेह मासिकाच्या संपादिका मंजुश्री गोखले यांच्या पन्नासाव्या पुस्तकाचं प्रकाशन मकर संक्रांतीच्या दिवशी पुणे येथे संत साहित्याचे गाढे अभ्यासक व संत नामदेव अध्यासनाचे माजी अध्यक्ष डॉ. अशोक कामत यांच्या हस्ते झाले. संत एकनाथांच्या जीवनावर आधारित ज्ञानयोगी एकनाथ या कादंबरीचा प्रकाशन सोहळ्यानंतर या कादंबरीवर परीसंवाद झाला. कार्यक्रमाला रसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर सर्वांनी संक्रांतीच्या भोजनाचा आस्वाद घेतला.

## भावपूर्ण श्रध्दांजली !



**कै. श्री. संतोष माधव गद्रे**

मे. दामोदर शिवराम आणि कंपनीचे भागीदार व डायरेक्टर आणि गद्रे परिवारातील ज्येष्ठ सदस्य कै. श्री. संतोष माधव गद्रे यांचे दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी दु:खद निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्गती देवो ! कोल्हापूर चित्पावन संघ आणि चित्पावन परिवार गद्रे कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहोत.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024

ISO 9001-2008
UL Approved

# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO

TÜV CERT DIN EN ISO 9001:2000 CERTIFICATE: 01 100 028964
C-DOT
R.D.S.O.




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.